ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ११ जून, १९५८ | अंक १४

## विविध माहिती

**आयुर्विम्यासंबंधीं अनुबोधपट**—भारत सरकारच्या चित्रपट विभागानें लोकांना आयुर्विम्यासंबंधीं माहिती देणारा एक अनुबोधपट तयार केला आहे. विम्यामुळें विमेदारांना उपलब्ध होऊ शकणाऱ्या अनेक हितकारक गोष्टींचा त्यांत परिचय करून देण्यांत आला आहे. शिवाय विमा कॉर्पोरेशनचें कामकाज कसें चालतें तेंहि दाखविण्यांत आलें आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—दक्षिण हिंदुस्थानांत उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्याचा मध्यवर्ती सरकारतर्फे विचार चालू आहे. मदुरा-रामनाद चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेला भारत सरकारच्या उद्योग व व्यापार खात्यातर्फे आलेल्या पत्रांत वरील माहिती देण्यांत आली आहे.

**आंध्र राज्यांत ग्रामीण विद्यापीठ**—हैद्राबादजवळ ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याच्या शक्यतेचा आंध्रचें सरकार विचार करीत आहे. विद्यापीठासाठी लागणारी साधनसामुग्री अमेरिकेच्या तांत्रिक-सहकार्य-मंडळातर्फे मिळविण्यांत येणार आहे. विद्यापीठाच्या स्थापनेसाठी १ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**विजेच्या पुरवठ्यांत वाढ नाहीं**— अहमदाबाद वीज कंपनीनें शहरांतील वाढत्या उद्योगधंद्यांना लागणारी वीज पुरविण्यासाठी वीज केंद्राचा विस्तार करण्याची योजना आंखली होती. पण परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईमुळें योजनेसाठी लागणारी यंत्रसामुग्री आयात करणें अशक्य झालें आहे. परिणामीं, उद्योगधंद्यांना जादा वीज पुरविता येणार नाहीं असें सांगण्यांत आलें आहे.

**अमेरिकेंतील अणुविद्युत् केंद्र**—अमेरिकेंतील शिपिंगपोर्ट येथें अणुशक्तीच्या साह्यानें व्यापारी प्रमाणावर वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्राचें औपचारिक उद्घाटन प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं केलें. पिट्सबर्ग येथील कारखान्यांना व घरांना ६०,००० किलोवॅट इतकी वीज केंद्रांतून पुरविण्यांत येईल. केंद्राच्या उभारणीसाठी ११ कोटी डॉलर्स खर्च आला.

**रशिआ-अमेरिका सहकार्य**—जागतिक आरोग्य संघटनेच्या कक्षेबाहेर असणाऱ्या चार वैद्यकीय मदत योजनांच्या बाबतींत रशिआशीं सहकार्य करण्याची तयारी अमेरिकेनें दाखविली आहे. रशिआनें आफ्रिका व द. अमेरिका ह्या देशांतील हिंवताप व देवी ह्यांच्या उच्चाटनाच्या कामीं अमेरिकेचें सहकार्य मागितलें होतें.

**पुस्तक प्रकाशनांत भारताचा चौथा अनुक्रम**—दरवर्षी प्रसिद्ध करण्यांत येणाऱ्या पुस्तकांच्या बाबतींत भारताचा अनुक्रम जगांतील देशांत चौथा लागतो. कांहीं पश्चिम युरोपांतील देशांपेक्षाहि भारतांत अधिक पुस्तकें प्रकाशित करण्यांत येतात. सगळ्यांत अधिक पुस्तकें रशिआंत प्रकाशित करण्यांत येतात. त्यांची संख्या ६०,००० इतकी असावी.

**अमेरिकेचें ब्रह्मदेशाला कर्ज**—ब्रह्मदेशाच्या सरकारला अंतर्गत सुरक्षितता राखण्यास मदत करण्यासाठी म्हणून अमेरिकेनें १ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलें आहे. कर्जाची मुदत चाळीस वर्षांची असून फेड ब्रह्मदेशाच्या अगर अमेरिकेच्या चलनांत करावयाची आहे. कर्ज अमेरिकेच्या एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँकमार्फत देण्यांत आलें आहे.

**झारिआ विभागांत पाण्याचा दुष्काळ**—झारिआ कोळशाच्या खाणी विभागांतील तळीं व विहिरी आटून गेल्या आहेत. ह्या भागांत पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ पडला असून एक बादलीभर पाण्यासाठी ८ आणे किंमत द्यावी लागत आहे. उष्णतामान ११४ अंशांपर्यंत वाढलें आहे.

**विद्यापीठाला देणगी** – अलाहाबाद विद्यापीठाचा ७० वा वर्षदिन येत्या डिसेंबर महिन्यांत साजरा करण्यांत येणार आहे. ह्या निमित्तानें विद्यापीठ अनुदान मंडळानें संस्थेला १० लाख रुपयांची देणगी खास भेट म्हणून दिली आहे. मदतीचा उपयोग वाचनालयासाठी नवी इमारत बांधण्याकडे करण्यांत येणार आहे.

**तेलवाहू बोटीची मागणी**—सरकारी मालकीचें वेस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन जपानकडे १०,००० टनांची तेलवाहू बोट बांधविण्याची मागणी नोंदणार आहे. बोटीची किंमत जपाननें भारताला दिलेल्या येनच्या कर्जांमधून देण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### भारताचा पूर्व-युरोपशीं व्यापार

भारत आणि पूर्व युरोपांतील देश ह्यांच्यांतील व्यापाराची वृद्धि करण्याच्या हेतूनें त्या देशाचा दौरा करण्यासाठी एक प्रतिनिधी मंडळ रवाना झालें आहे. भारत सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याचे उपमंत्री श्री. सतीशचंद्र हे मंडळाचे पुढारी आहेत. ह्या देशांतील बाजारपेठांचा अभ्यास करून भारताच्या मालाच्या निर्यातींत वाढ करण्याचा प्रयत्न मंडळ करणार आहे. पूर्व युरोपांतील देश भारताकडून चहा, कॉफी, तागाच्या वस्तू, काथ्याचा माल, तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, इत्यादी जिनसा आयात करतात. ह्या मालाच्या आयातीसंबंधीं पूर्व युरोपांतील देश अलीकडे वाढती उत्सुकता दाखवूं लागले आहेत. भारताचें प्रतिनिधी मंडळ आपल्या दौऱ्यांत सरकारी व्यापार खात्यांचे अधिकारी व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी ह्यांची गांठ घेईल, आण उभयतां देशांमधील व्यापार कसा वाढवितां येईल ह्यासंबंधीं चर्चा करील. झेकोस्लोव्हाकिआ, पोलंड, रुमेनिआ, बल्गेरिआ, युगोस्लाव्हिआ, हंगेरी आणि पूर्व जर्मनी इतक्या देशांचा दौरा मंडळ करणार आहे. सध्यां भारताला दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी भांडवली माल व कच्चा माल ह्यांची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागत आहे. त्यामुळें परदेशीय हुंडणावळीच्या सांठ्यावर फारच ताण पडत आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारताची निर्यात वाढली असली तरी आयात त्यापेक्षा अधिक प्रमाणांत वाढली आहे. त्यामुळें भारताच्या परदेशीय व्यापारांत प्रतिकूल तफावत पडलेली आहे. म्हणून निर्यात वाढविण्याचा हा आणखी एक प्रयत्न आहे.

---

### भारतांत रिस्टवॉचेसची आयात

नोव्हेंबर, १९५७ अखेर संपलेल्या अकरा महिन्यांत भारतांत ७,९२,३१८ रिस्टवॉचेसची आयात झाली. त्या आयातीची देशवार वर्गवारी खाली दिली, त्यावरून दिसून येईल कीं त्यापैकी ६,६०,६७९ घड्याळें एकट्या स्वित्सरलंडमधूनच आली.

| देश | मनगटावरील घड्याळें | किंमत (रु.) |
|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | ३,९४६ | ९९,००० |
| प. जर्मनी | ९५,७२४ | १९,४७,००० |
| फ्रान्स | १६,०८५ | २,३०,००० |
| हाँगकाँग | ५,६३५ | १५,००० |
| अमेरिका | १,०५२ | १,६०,००० |
| इतर देश | ९,१९५ | |
| | १,३१,६३७ | २४,७८,००० |
| स्वित्सरलंड | ६,६०,६७९ | १९,४४,३४,००० |

---

**मच्छीमारीचें केंद्र**—विशाखापट्टम् येथें खोल समुद्रांतील मच्छीमारी करण्याचें एक केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें कोकोनाडा येथें बोटी बांधण्याचा एक कारखानाहि स्थापन करण्यांत येणार आहे. मच्छीमारीच्या केंद्रासाठी भारत-सरकार चार यंत्रसज्ज बोटी पुरविणार आहे.

**रीफायनॅन्स कॉर्पोरेशनची कचेरी**—शेड्यूल्ड बँकांमार्फत उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जें देणाऱ्या रीफायनॅन्स कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी बहुधा मुंबईत उघडण्यांत येईल. कॉर्पोरेशनमध्यें शेड्यूल्ड बँका भागीदार म्हणून सामील आहेत.


स्थापना सन १९३५ टे. नं. ३६२५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोर ,,
श्री. ह्म. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

---

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

वहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. ११ जून, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## एंजिनिअरिंग मालाची १९५७ मधील निर्यात

भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या एंजिनिअरिंग मालांत १९५७ सालीं थोडीबहुत वाढ झालेली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या सुमारें १५० वस्तू भारतामधून परदेशांत निर्यात करण्यांत येतात. त्यांत डिझेल एंजिनें, शिवण्याचीं यंत्रें विजेचे पंखे, पंप, शेतीचीं अवजारें, तेलाच्या गिरण्या, इत्यादींचा समावेश होतो. ह्या सर्वच मालाची निर्यात वाढलेली आहे. १९५६ सालीं ४·२३ लाख रुपये किंमतीचीं डिझेल एंजिनें निर्यात करण्यांत आलीं होतीं. १९५७ सालीं १० लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचीं एंजिनें निर्यात करण्यांत आलीं. डिझेल एंजिनांची निर्यात २५ देशांना करण्यांत आली. बहरिन बेटें, ओमन, सायप्रस आणि सयाम हे देश भारतीय डिझेल एंजिनांचीं प्रमुख गिऱ्हाइकें आहेत. १९५६ सालीं ४·३ लाख रुपये किंमतीचीं शिवण्याचीं यंत्रें निर्यात करण्यांत आलीं होतीं. १९५७ सालीं ५·६ लाख रुपये किंमतीचीं यंत्रें निर्यात करण्यांत आलीं. १८ निरनिराळ्या देशांना शिवणाचीं यंत्रें निर्यात करण्यांत आलीं. भारताचीं शिवणाचीं यंत्रें ऑस्ट्रेलिया, सिलोन, केनिया ह्या देशांतून घेतलीं जातात. १९५६ सालीं १२·७ लाख रुपये किंमतीचे विजेचे पंखे निर्यात करण्यांत आले. १९५७ सालीं १३ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे पंखे निर्यात करण्यांत आले. भारतांमधील पंखे ३० देशांना पाठविले जातात. त्यांत सिलोन, ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, सयाम, इत्यादि देश प्रमुख आहेत. शेतीच्या अवजारांच्या निर्यातींतहि वाढ झालेली आहे. १९५६ सालीं ८·८ लाख रुपये किंमतीची यंत्रें निर्यात झालीं होतीं १९५७ सालीं ११·२ लाख रुपये किंमतीचीं निर्यात झालीं.

## उत्तरप्रदेशांत भिंगांचा कारखाना

भारतामध्यें दुर्बिणी, चष्मे, शास्त्रीय उपकरणें, इत्यादि वस्तू तयार करण्यासाठीं जीं भिंगें लागतात तीं तयार करण्याचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संकल्पित कारखान्यासंबंधी सल्ला व सहकार्य देण्यासाठीं तीन रशिअन तज्ज्ञांचें एक मंडळ उत्तर प्रदेशाच्या दौऱ्यावर गेलें होतें. अलाहाबादजवळ नैनी ह्या ठिकाणीं कांचकारखाना काढण्यास सोयीची जागा आहे असें मत त्यांनीं व्यक्त केल्याचें समजतें. तथापि, त्यांचा अधिकृत अहवाल अद्याप सरकारला सादर व्हावयाचा आहे. नैनी ह्या ठिकाणीं राज्य सरकारनें एका इंडस्ट्रिअल एस्टेटची स्थापना अगोदरच केलेली आहे. शिवाय, कारखान्यासाठीं लागणारा कच्चा माल व मजूर ह्यांचीहि ह्या ठिकाणीं सुबत्ता आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येणार असून त्या कामीं भारत सरकारला रशिआकडून सहकार्य मिळणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं जें भांडवल लागेल तें अद्याप अजमावण्यांत आलेलें नाहीं. परंतु तें मोठ्या प्रमाणावर निघणार आहे येवढें मात्र निश्चित आहे. कारखान्याच्या नुसत्या इमारतींसाठींच एक कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय यंत्रसामुग्री व इतर आनुषंगिक बाबी ह्यांना येणारा खर्च वेगळाच. कारखाना बंगालमध्यें दुर्गापूर ह्या ठिकाणीं काढण्यांत यावा असे प्रयत्न सुरू होते. प्राथमिक पाहणी करणाऱ्या रशिअन तज्ज्ञांनीं दुर्गापूरला भेटहि दिली होती. पण नैनी येथें कारखाना उभारण्यांत आल्यास खर्चांत बरीच बचत होईल असें त्यांचें मत पडलें. म्हणून नैनीची निवड करण्यांत आली.

## ओरिसामधील जुनें बंदर पुन्हां चालू

ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावरील परदीप हें बंदर १०० वर्षांनीं पुन्हां चालू झालें आहे. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील हें बंदर अति पूर्वेकडील देशांशीं सागरी दळणवळण ठेवण्यास चांगलें उपयोगी पडेल आणि त्यामुळें कलकत्ता बंदरावरील वहातुकीचा ताणहि थोडाबहुत कमी होईल. हें बंदर महानदीच्या मुखाशीं असून त्याचा विकास करण्याच्या कामीं ओरिसा सरकार आणि भारत सरकार ह्यांनीं सहकार्य केलेलें आहे. ओरिसामधील लोखंड व इतर खनिजांच्या मार्गी ह्यांचीं निर्यात करण्यास तर तें विशेषच उपयोगी आहे. ओरिसांतील अशुद्ध लोखंड टोकिओला नेण्यासाठीं एका जपानी कंपनीनें एका भारतीय बोटीला काम दिलें आहे. ही बोट कलकत्ता बंदरांतून निघून परदीपला गेली असून तेथून ४,००० टन अशुद्ध लोखंड भरून घेऊन तीं जपानला जाणार आहे. जपान व भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी करारप्रमाणें जपान भारताकडून अशुद्ध लोखंड घेऊन पंचवार्षिक योजनेच्या पूर्तीसाठीं लागणारी कांहीं यंत्रसामुग्री पुरविणार आहे. परदीप हें बंदर १९०० सालीं थोडेंबहुत उपयोगांत आणण्यांत आलें होतें. परंतु, त्यानंतर मोठें बंदर ह्या नात्यानें त्याचा दर्जा नष्ट झाला होता. कलकत्ता येथील पुष्कळ वाहतूक कंपन्यांचे प्रतिनिधी आतां परदीप येथें गेले असून बंदराच्या उपयुक्ततेवर नजर ठेवीत आहेत. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या मोठ्या बंदरांत पुष्कळदां जहाजांची गर्दी होते. तिची तीव्रता कमी करण्यासाठीं परदीपचा उपयोग होण्यासारखा आहे.

---

रेल्वेसाठीं जपानी चाकं—भारतामधील रेल्वेसाठीं रुंद रुळावर चालणाऱ्या चाकांच्या २,६०० जोड्यांची मागणी एका जपानी कारखान्याकडे नोंदविण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें कलकत्ता येथील एका कारखान्याकडे व मुंबई येथील एका कारखान्याकडे मालवाहू डबे तयार करण्याचें काम सोपविण्यांत आलें आहे.

बूट पॉलिश करणाऱ्यांचा संघ मुंबईतील फोर्ट भागांत बूट पॉलिश करणारीं १५० मुलें आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील तिरुनेलवेली येथूनच तीं मुंबईंत आलेलीं आहेत. त्यांनीं आपली संघटना स्थापन केलेली आहे. तीं एकत्रच रहातात. त्यांची मिळकत दररोज प्रत्येकी ७ रुपयांची आहे.

## रीफायनॅन्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि.

वरील कॉर्पोरेशन कंपनी कायद्याखाली नोंदविण्यांत आली असून, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर तिचे चेअरमन रहाणार आहेत. कॉर्पोरेशन स्वतः कर्ज देणार नसून, १५ हिंदी व विदेशी बँकांना उद्योगधंद्यांस कर्जे देण्यास मदत करणार आहे.

### योजनेंतील बँका

कॉर्पोरेशनची नोंदलेली कचेरी मुंबई येथें रिझर्व्ह बँकेच्या इमारतींत आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २५ कोटी रु. आहे. तूर्त १२½ कोटी रु. चें भांडवल विकलें जाईल. रिझर्व्ह बँक, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन आणि पंधरा शेड्यूल्ड बँका तें भांडवल घेतील. ह्या बँका खालीलप्रमाणें आहेत :— स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, नॅशनल ओव्हरसीज अँड ग्रिंडलेज बँक, युनायटेड कमर्शिअल बँक, लॉईड्स बँक, अलाहाबाद बँक, चार्टर्ड बँक, इंडियन बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, मर्कंटाईल बँक, देवकरण नानजी बँकिंग कंपनी, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद.

### अमेरिकेचें साह्य

१९५६ मध्यें भारत सरकार व अमेरिकेचें सरकार ह्यांचेमध्यें "ॲग्रिकल्चरल कमॉडिटीज ॲग्रिमेंट" हा करार झाला. त्या अन्वयें, अमेरिकन सरकारनें सुमारें २६ कोटी रुपये खाजगी, मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना कर्जाऊ देण्यासाठी राखून ठेवले. त्यांतून भारत सरकार रीफायनॅन्स कॉर्पोरेशनला जरूरीप्रमाणें रकमा व्याजानें उपलब्ध करील. विकी केलेल्या भांडवलाचे १२½ कोटी रु. व वरील २६ कोटी रुपये, असे ३८½ कोटी रुपये कॉर्पोरेशनला कर्जाऊ देण्यासाठी हातीं येतील. त्यांतून योजनेंतील प्रत्येक शेड्यूल्ड बँकेला ठराविक कर्ज मंजूर केलें जाईल. त्या मंजूर मर्यादेंत शेड्यूल्ड बँकेनें कर्जे द्यावयाचीं आहेत.

### कर्जे कोणास मिळतील ?

हीं कर्जे मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांनाच दिलीं पाहिजेत. कोणत्याहि एका उद्योगधंद्याला ५० लक्ष रुपयांपेक्षा अधिक कर्ज देतां कामा नये. कर्जाची मुदत ३ ते ५ वर्षें राहील; त्यापेक्षा कमीहि नाहीं व जास्तीहि नाहीं. ज्या उद्योगधंद्याचें भांडवल व रिझर्व्ह २½ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे, अशालाच कर्ज मिळूं शकेल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत व त्यानंतरच्या योजनांत समाविष्ट असलेले उद्योगधंदेच, उत्पादनवाढीसाठीं, कर्ज-मंजुरीस पात्र रहातील.

### संचालक मंडळ

कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळांत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, रिझर्व्ह बँकेचे एक डेप्युटी गव्हर्नर, स्टेट बँकेचे चेअरमन, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे चेअरमन आणि योजनेंत समाविष्ट केलेल्या शेड्यूल्ड बँकांचे तीन प्रतिनिधी, असे सात सभासद आहेत.

---

## स्टेट बँकेच्या पाकिस्तानांतील शाखा

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पाकिस्तानांतील सर्व शाखा चालू रहाण्यास पाकिस्तान सरकारनें संमति दिली आहे. बँकेचे चेअरमन, श्री. पी. सी. भट्टाचार्य, हे नुकतेच डाक्याहून परत आले; त्यांनीं ही माहिती सांगितली. पाकिस्तानांतील इतर परदेशी बँकांसारख्याच सवलती स्टेट बँक ऑफ इंडियाला त्या देशांत मिळत आहेत, पण ह्या बँकेच्या नांवामुळेंच तिचें विरुद्ध लोकमत आहे. स्टेट बँकेच्या पाकिस्तानांतील शाखांतील सर्व नोकर पाकिस्तानचेच रहिवासी असल्यानें, त्यांच्या पगाराचे पैसे भारतांत आणण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं व सोडविण्याची पाळी येत नाहीं. स्टेट बँकेला पाकिस्तानांतील व्यवहारांत कशीबशी तोंडमिळवणी करतां येते; नफा उरत नाहीं.


# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

( स्थापना : डिसेंबर १९११ ) ★ मुख्य कचेरी : मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ... | रु. ६,३००,०,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | ... | रु. ३,१४,५४,२५० |
| राखीव व इतर निधी | ... | ... | रु. ४,०३,६०,८२० |
| ठेवी ( ३१-१२-१९५७ ) | ... | ... | रु. १,५५,१४,५०,६६४ |

—संचालक मंडळ—

सर होमी मोदी, के. बी. ई., चेअरमन
श्री. कुंवरजी होरमसजी भाभा, व्हाइस चेअरमन
श्री. दिनशॉ डी. रोमर
श्री. धरमसी मुळराज खटाव
श्री. मनमोहनदास माधवदास अमरसी
श्री. सी. पी. वाडिया
श्री. चिमणलाल बापालाल पारेख
श्री. फ्रामरोझ जे. गझदर
सर जमशेटजी जिजीभॉय, बॅरोनेट
हिज हायनेस सर जिवाजीराव माधवराव सिंधिया, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई.
महाराजा ऑफ ग्वाल्हेर

भारत, पाकिस्तान व ब्रह्मदेश या देशांत, सर्व प्रमुख शहरीं आणि इतर ठिकाणीं बँकेच्या ३०० चे वर शाखा आहेत.
लंडन शाखा : १५९ फेन् चर्च स्ट्रीट, लंडन, ई. सी. ३. जगांतील प्रमुख राष्ट्रांतील बँकांशीं एजन्सी व्यवस्था.

**दि. १२-६-५८ पासून आमची टिळक रोड शाखा पर्वती चौक, टिळक रोड, पुणें २ येथें सुरू होत आहे.**

पुण्यांतील इतर शाखा :

(१) लक्ष्मीरोड (२) ईस्ट स्ट्रीट

श्री. आर. सोनाळकर, चीफ एजंट, पूना ग्रुप. * * * एन्. के. करंजीया, जनरल मॅनेजर

## बँकेच्या घेणेकऱ्याचा अधिकार

### ट्रस्टचें नातें संपुष्टांत केव्हां येतें ?

### ( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका ( इन् लिक्विडेशन ) च्या एका गिऱ्हाइकानें स्वतःस अग्रहक्काचे घेणेकरी ( प्रेफरेन्शिअल क्रेडिटर ) मानण्यांत यावें, असा केलेला दावा मुंबई हायकोर्टानें नामंजूर केला. गिऱ्हाइकाची ३०,१९९ रु. ची रक्कम बँकेनें त्याच्यासाठी ट्रस्टी ह्या नात्यानें धारण केली होती, असें त्याचें म्हणणें होतें. १८ एप्रिल, १९४९ रोजीं त्यानें बँकेच्या मद्रास शाखेकडे एडनला वसूल करावयाच्या चार हुंड्या दिल्या. २५ एप्रिल रोजीं त्यापैकीं तीन वसूल झाल्या, व चवथी हुंडी २६ एप्रिल रोजीं वसूल झाली. त्यांची एकूण रक्कम ३०,१९९ रु. भरली. बँकेला ह्याची खबर २ मे, १९४९ रोजीं मिळाली त्याच दिवशीं बँक गुंडाळण्यांत यावी असा अर्ज करण्यांत येऊन तो मंजूर केला गेला. इतर गिऱ्हाइकांपेक्षा ह्या गिऱ्हाइकास रक्कम मिळण्याचा अग्रहक्क आहे, हा त्याचा दावा खालच्या कोर्टानें मान्य केला नाहीं. त्यावर हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें

" गिऱ्हाइकानें बँकेकडे हुंड्या वसुलीसाठी दिल्या होत्या हा एकच मुद्दा येथें महत्त्वाचा आहे " असें सर न्यायाधीश छगला व न्या. देसाई ह्यानीं नमूद केलें. बँक ही गिऱ्हाइकाची पैसे वसुलीसाठी एजंट होती हुंड्यांच्या रकमेचें पुढें काय करावयाचें हें गिऱ्हाइकानें बँकेस सांगितलें नव्हतें. गिऱ्हाइकाचें बँकेंत खातें आहे. बँकेनें एजंट ह्या नात्यानें हुंड्या वसुलीसाठी घेतल्या, तेव्हां बँक ही एजंट बनली व बँक आणि गिऱ्हाईक ह्यांत ट्रस्टीचें नातें निर्माण झालें, असें गिऱ्हाइकाच्या वतीनें सांगण्यांत आलें. परंतु, मुख्य मुद्दा असा, कीं हें प्रिन्सिपल-एजंटचें नातें किती काळ कायम असतें ? हें नातें केव्हांहि संपुष्टांत येऊं शकतें, व देणेकरी घेणेकरी असें नातें त्याची जागा घेऊं शकते. तेव्हां, हुंड्यांच्या रकमेचे बाबतींत बँक देणेकरी बनतें व गिऱ्हाईक घेणेकरी बनतें. प्रस्तुत प्रकरणांत, २ मे, १९४९ पर्यंत, बँक व गिऱ्हाईक ह्यांच्यांत प्रिन्सिपल-एजंट हें नातें कायम होतें काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. हें नातें कायम होतें असें ठरलें, तर गिऱ्हाइकाला म्हणतां येईल कीं चारहि हुंड्यांच्या रकमेचे बाबतींत बँक ही त्याची ट्रस्टी होती.

बँक लिक्विडेशनमध्यें जाण्यापूर्वी, २५ व २६ एप्रिल, १९४९ रोजीं हुंड्यांची रक्कम वसूल झाली, हें सिद्ध झालें आहे. ह्या रकमेचें पुढें काय करावें, ह्याबद्दल खातेदारानें बँकेस सूचना दिलेली नसल्या कारणानें, बँकेला ती रक्कम नित्याच्या व्यवहारासाठी वापरण्याचा अधिकार प्राप्त झाला. ती रक्कम बँकेच्या जिंदगींत जमा झाली; त्याबाबत ट्रस्ट निर्माण झाला नाहीं. हुंड्यांची रक्कम वसूल झाल्यावर ती गिऱ्हाइकासाठी राखून ठेवण्यांत यावी किंवा ती दुसऱ्या कोणाला तरी देण्यांत यावी किंवा तिचा कांहीं विशिष्ट विनियोग करावा, असें गिऱ्हाइकानें बँकेस कळविलें असतें, तर बँक व गिऱ्हाईक ह्यांचेमधील त्या रकमेपुरतें नातें बदललें असतें. परंतु, अशा सूचनेच्या अभावीं, हुंड्यांची रक्कम जमा झाल्यावर, " वसुलीसाठी नेमलेली एजंट " ही बँकेची भूमिका संपुष्टांत आली व बँकेला त्या रकमेचा हवा तसा उपयोग करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

मुंबई हायकोर्टाच्या पूर्वीच्या एका निवाड्यांत ( बँक ऑफ इंडिया वि. ऑफिशिअल लिक्विडेटर A. I. R. १५० Bom. २७५ ) न्या. तेंडोलकरांनीं असें नमूद केलें होतें :—" वसुलीसाठी बँक एजंट ह्या नात्यानें वागली, ही गोष्ट वसूल रकमेच्या बाबतींत बँक ही ट्रस्टी बनली असा सरळ निष्कर्ष काढण्यास पुरेशी आहे." न्या. तेंडोलकरांचें हें विधान बरोबर नाहीं व त्याला कायद्याचा दर्जा आतां राहिलेला नाहीं, असें न्या. छगला व न्या. देसाई ह्यांनीं स्पष्ट केलें आहे. ( १९५८ A. I. R Bom. १०० )

---

## भारतांतील सिमेंटचा धंदा

**सिमेंटचें उत्पादन :**—भारतांत १९५६ मध्यें ४·९ दशलक्ष टन सिमेंटचें उत्पादन झालें होतें. त्यांत १९५७ मध्यें वाढ होऊन तें ५·६ दशलक्ष टनांवर गेलें.

**प्रस्थापित शक्ति :**—सन १९५७ च्या सुरुवातीच्या ५·७ दशलक्ष टन उत्पादनाच्या प्रस्थापित शक्तींतहि वाढ होऊन १९५७ चे अखेरीस ती ६·६३ दशलक्ष टनांवर गेली.

**नव्या योजना :**—सध्यां चालू असलेल्या २९ सिमेंट कारखान्यांखेरीज दर वर्षी आणखी ८·६७ दशलक्ष टन सिमेंटचें उत्पादन करण्याच्या ५४ योजना भारत सरकारनें आतांपर्यंत संमत केल्या आहेत. २५ नवे कारखाने स्थापन करण्याच्या आणि चालू कारखान्यांच्या विकास करण्याच्या २९ योजना या योजनांत अंतर्भूत आहेत.

**त्या केव्हां पुऱ्या होणार ? :**—या योजनांपैकीं एकूण १·८ दशलक्ष टन उत्पादनाच्या १५ योजना ( नवीन कारखाने उभारण्यासंबंधीच्या अकरा व चालू असलेल्या कारखान्यांचा विकास करण्याच्या चार ) १९५८ चे अखेरीस पूर्ण होतील. तर एकूण १०·४ दशलक्ष टन उत्पादन शक्तीच्या दुसऱ्या ११ योजना १९५९ चे अखेरीस पूर्ण होतील अशी आशा आहे. उरलेल्या योजना १९६०-६१ पर्यंत पुऱ्या करावयाच्या आहेत.

**सिमेंटची आयात :**—भारतांत तयार होणारें सिमेंट व देशांतील त्याची मागणी यांमधील तूट कांहीं प्रमाणांत भरून काढण्याचे दृष्टीनें परदेशांतून ७,००,००० टन सिमेंटची आयात करण्याचें १९५६ च्या सुरुवातीला ठरवण्यांत आलें. यांपैकीं पुष्कळसें सिमेंट आयात करण्यासाठीं स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें निश्चित स्वरूपाची व्यवस्था केली होती. परंतु सुवेझ प्रकरण उद्भवल्यामुळें १९५६ मध्यें केवळ १,०८,००० टन सिमेंटची आयात झाली. करारांतील शिलकी बाकीनुसार १९५७ मध्यें आणखी ३,२१,००० टन सीमेंटची आयात झाली.

**सिमेंटची आयात थांबणार ? :**—भारतांतील सिमेंटच्या उत्पादनांत सुधारणा झाल्यामुळें पुरवठ्याच्या परिस्थितींत सुधारणा झाली आहे. आणि त्यामुळें सिमेंट वांटपावरील नियंत्रण कांहींसें सैल करणें शक्य झालें आहे. परकीय हुंडणावळीचा तुटवडा आणि भारतांतील सिमेंटचें वाढतें उत्पादन याचा विचार करतां भविष्य काळांत सिमेंटची आयात करणें अत्यावश्यक होईल असें वाटत नाहीं.

**ॲसबेस्टॉस सिमेंट :**—ॲसबेस्टॉस सिमेंटचा माल तयार करण्याचे दृष्टीनें कांहीं कारखान्यांत आधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यांत आल्यानें या धंद्यांची १९५६ मधील १,४१,००० टन उत्पादनशक्ति २,१०,००० टनांवर गेली असून १९५६ मधील १,१९,८२८ टन उत्पादन चालू वर्षी १,५३,७६१ टनांवर गेलें आहे. बहुतेक सर्व कारखाने पूर्णपणे चालू आहेत.

### रेल्वेबोर्डाच्या धर्तीवर पोस्टस अँड टेलिग्राफ्स बोर्ड !

रेल्वेबोर्डाच्या धर्तीवर, पोस्ट व तार खात्यासाठी एक स्वतंत्र बोर्ड असावें, अशी एक योजना आखण्यांत येत आहे. ह्या बोर्डाचे तीन सभासद असतील; एक टेलि-कम्युनिकेशन्ससाठी, एक पोस्टासाठी व एक आर्थिक व्यवहारासाठी. चेअरमन हा आणखी वेगळा असेल. प्रत्येक सभासदाला एक सल्लागार राहील. त्याला 'असोसिएटेड मेंबर' किंवा 'डायरेक्टर' असें म्हटलें जाईल. त्याच्याकडे पोस्टल विमा, सेव्हिंग्ज बँका, पोस्टल सर्टिफिकिटें, टपालाची वाहतूक, अशापैकीं खातीं रहातील. बोर्डाचे निर्णय हे सरकारी निर्णयांप्रमाणें अंतिम समजले जातील. बोर्ड स्वतःचें अंदाजपत्रक तयार करील. ही योजना सरकारला पसंत पडल्यास, चालू आर्थिक वर्ष संपण्यापूर्वीच ती अंमलांत येईल.

### भारतांतील औद्योगिक कलह (१९५७)

| महिना | एकूण कलह | सबंधित कामगार सख्या |
|---|---|---|
| जाने. | १५५ | १,२६.४९० |
| फेब्रु. | १२४ | ४८,७३३ |
| मार्च | ११३ | ४५,९९० |
| एप्रिल | १६१ | ६१,२६० |
| मे | १६३ | ६८,२३० |
| जून | १५३ | १,००,२२० |
| जुलै | १९८ | ९१,७४९ |
| ऑगस्ट | २०५ | १,४४,८५१ |
| सप्टें | २३२ | १,४४,५७९ |
| ऑक्टो. | २२२ | १,०२,८८४ |
| नोव्हें. | १७५ | ५६,१६८ |
| डिसें. | १५५ | ८२,४७१ |

### अमेरिकेंतील वहातुकीचा व्यवसाय

अमेरिकेंतील वहातुकीच्या व्यवसायांत काम करणाऱ्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| ट्रक व बसेस चालविणारे | ५६,००,००० |
| मोटरच्या धंद्यांत काम करणारे | १९,००,००० |
| हायवे डिपार्टमेंटमध्यें काम करणारे | २,४०,००० |
| टायर्स व मोटरचे पार्टस तयार करणाऱ्या कारखान्यांत काम करणारे | ९,०० ००० |
| दळणवळण व वाहतुक व्यवसायाच्या संबंधित कामांत गुंतलेले | ६,००,००० |
| गॅसोलिन व तेल तयार करण्याच्या कामांत गुंतलेले | ३,००,००० |

**Deccan Institute of Commerce**
*717, Budhwar Peth, Poona-2.*
( Govt. Recognised )

Opens for the 1958-59 Session on Monday the 23rd June 1958. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., G. D. C. & A., C. A. I. I. B., A. C. W. A., Shorthand, Typewriting and Poona University's External Pre-Degree Course-Commerce. Morning and Evening Classes.

Admission to respective Courses open to S. S. C., Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Principal.

**भोर स्टेट बँक लि.**
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. व. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

**दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.
ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४१,०८,०००
मुंबई सरकारतर्फे रु. ६६,००,०००
रु. १,०८,०८,०००

| | |
|---|---|
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ६०,७६,००० |
| एकूण ठेवी : | रु. ११,००,२६,००० |
| खेळतें भांडवल : | रु. २०,५०,००,००० |

११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा
भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## बिल मार्केट योजनची प्रगति

( कोटी रुपये )

| शेवटचा आठवडा | शिड्यूल्ड बँकेकडून शेड्यूल्ड बँकांनीं घेतलेलीं एकूण कर्जें | त्यापैकीं बिल मार्केट योजनें खालील कर्जें | ३ चें २ शीं प्रमाण % | शिड्यूल्ड बँकेकडून शेड्यूल्ड बँकांनीं घेतलेल्या कर्जांची ज्यातील जास्त रक्कम | बिल मार्केट योजनेखालीं घेतलेल्या कर्जांची ज्यास्तीत जास्त रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सप्टेंबर १९५२ | २·३७ | १·२४ | ५२·३२ | ५६·०७ ( मार्च १९५२ ) | २९·३० ( १० मे १९५२ ) |
| सप्टेंबर १९५३ | २·१८ | ०·४९ | २२·४८ | २०·५८ ( मे १९५३ | २०·३० ( ९ जून १९५३ ) |
| सप्टेंबर १९५४ | ५·४९ | १·०४ | १८·९४ | ४७·४४ ( मे १९५४ ) | ३०·९६ ( ११ मे १९५४ ) |
| डिसें. ,, | ९·६३ | २·९० | ३०·११ | ३७·९० (१ एप्रिल १९५५ | ३३·४३ ( १३ मे १९५५ ) |
| मार्च १९५५ | २७·०८ | २८·२५ | ७६·१९ | | |
| जून ,, | १७·२२ | १६·७१ | ९७·०४ | | |
| सप्टेंबर ,, | ९·१८ | ७·८० | ८४·९७ | | |
| डिसेंबर ,, | ३०·०२ | १८·८६ | ६२·८२ | ७३·७७ ( १० मे १९५६ ) | ५२·०८ ( ११ मे १९५६ ) |
| मार्च १९५६ | ६४·७४ | २७·४३ | ४२·३७ | | |
| जून ,, | ५३·२७ | ३७·५७ | ७०·५३ | | |
| सप्टेंबर ,, | ६३·२४ | ३६·३७ | ५७·५१ | | |
| डिसेंबर ,, | ७९·०६ | ५७·२० | ७२·३५ | १०३·१६ (२९मार्च १९५७) | ७३·७९ ( २३ मार्च १९५७) |
| मार्च १९५७ | १०३·१६ | ७१·५४ | ६९·३५ | | |
| जून , | ६२·०९ | ५०·२१ | ८०·८७ | | |
| सप्टेंबर ,, | ३७·२० | ३०·८५ | ८२·९३ | | |
| डिसेंबर ,, | २३·६३ | २१·०७ | ८९·१७ | ४४·९३ (३० डिसें. १९५७) | ३२·४२ ( ४ ऑक्टो. १९५७ ) |
| मार्च १९५८ | ४२·०० | २६·५८ | ६३·२९ | | |

**क्रुप कंपनीचा रशिआशीं सौदा**—पश्चिम जर्मनींतील भारी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत अग्रगण्य असलेल्या क्रुप ह्या पोलाद कंपनीनें रशिआला ५ कोटी मार्कस किंमतीची यंत्रसामुग्री पुरविण्याचें कबूल केलें आहे. कंपनीचे मुख्य मॅनेजर रशिआच्या प्रमुख शहरांतील मोठ्या कारखान्यांना भेट देण्यास गेले होते त्यावेळीं हा सौदा ठरविण्यांत आला.

**भिकाऱ्यांची अदलाबदल**—मुंबई सरकार व बंगाल सरकार ह्यांनीं मुंबईत बाहेरून आलेल्या भिकाऱ्यांची अदलाबदल करण्याचें ठरविलें आहे. मुंबईत सुमारें १५,००० भिकारी असून त्यांपैकीं ५५ टक्के भिकारी उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, आंध्र व मद्रास ह्या राज्यांतून आलेले आहेत.

**गोव्याला जाणारांची गर्दी**—भारत सरकारनें गोव्याला जाण्याबद्दलचे निर्बंध सैल केल्यापासून सुमारें ४०,००० गोवेकर आपल्या नातलगांना भेटण्यासाठी जाऊन आले. ह्यापैकीं बहुतेक लोक मुंबईमधील होते त्यांनीं कारवार मार्गानें प्रवास करून एप्रिल व मे महिन्यांत गोव्याला भेटी दिल्या.

## दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. च्या टिळक रोड शाखेचें उद्घाटन

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ची टिळक रोड (पुणें शाखा दि. १२ जूनपासून सुरू होत आहे. बँकेची एक शाखा लक्ष्मीरोडवर व दुसरी शाखा ईस्ट स्ट्रीटवर आहे. म्हणजे, बँकेची पुण्यांतील ही तिसरी शाखा होईल. टिळक रोड शाखा त्या भागांतील मध्यवर्ती ठिकाणीं, पर्वती चौक येथें असून, त्या शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था करण्यांत येत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया ही सरकारी बँक वगळली, तर सेंट्रल बँक ही भारतांतील सर्वांत मोठी बँक आहे. तिचे खालील अनुक्रमाच्या बँकेपेक्षा सेंट्रल बँकेच्याकडील ठेवी ३० कोटी रुपयांनीं जास्त आहेत. बँकेचें वसूल भांडवल आणि राखीव व इतर निधी ह्यांची रक्कम ७ कोटी १८ लक्ष रुपयांहून अधिक आहे आणि ठेवींची रक्कम १५५ कोटी रुपयांचेवर आहे. भारतांत व भारताबाहेर मिळून बँकेच्या ३०० वर शाखा आहेत. बँकेच्या संचालक मंडळांत भारतांतील अग्रेसर व्यापारी व उद्योगपती आहेत. पूना ग्रुप चीफ एजंट श्री. व्ही. आर. सोनाळकर ह्यांना भारतांतील व्यापारी व औद्योगिक बँकिंगचा दीर्घ अनुभव असून, त्यांनीं मोठमोठ्या बँकिंग संस्थांतून जबाबदारीचीं कामें पार पाडलेलीं आहेत. टिळक रोड शाखेचे प्रारंभींचे अधिकारी म्हणून श्री. बी. बी. पुरोहित ह्यांची योजना झालेली आहे.

**मेयर्सची परिषद**—भारतामधील प्रमुख शहरांच्या मेयर्सची परिषद हैदराबाद येथें भरली होती. ठिकठिकाणच्या कॉर्पोरेशन्सपुढें असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांचा परिषदेंत विचार करण्यांत आला. विशेषतः कॉर्पोरेशन्सचीं उत्पन्नें वाढविण्याच्या मार्गासंबंधीं चर्चा करण्यांत आली.


सुरक्षितता, सेवा व स्थैर्य

यासाठी महाराष्ट्र बँकेची निवड करणें योग्य

दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

खेळतें भांडवल .... रु. दहा कोटींचे वर

★ व्यापारी उलाढालींच्या ४१ केंद्रांत बँकेच्या शाखा असल्यामुळें महाराष्ट्र बँकेंत खातें उघडल्यानें आर्थिक व्यवहारांत विशेष सोय.

★ हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना ( पुणें ), सोलापूर ( फलटण गल्ली शाखा ), अहमदनगर, श्रीरामपूर, पनवेल व किर्लोस्करवाडी येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

★ लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★ महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कं लि. ही व्यवस्थापत्र, विश्वस्तपत्र, वगैरेंचीं कामें करते.

मुख्य कचेरी, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर

सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )
मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

**मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा**

आमच्या ठेवीदारांसाहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षे | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षे | ,, | ३।॥ | ,, |
| ४ वर्षे | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खाती १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारली जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, चौदा लाखांवेवर |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.



## दि सांगली बँक लि.

**सांगली.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



### 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



### कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : -श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



## * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल ... ... | रु. ५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १३/४% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.